# PROSPECTUS

Reg. No. F-1776

Saibaba Shikshan Prasarak Mandal, Aurangabad.

# SHANTA BABURAO PAWAR SENIOR COLLEGE OF ARTS

Saibaba Shikshan Prasarak Mandal

Reg. No. F-1776

SHANTA BABURAO PAWAR SENIOR COLLEGE

## B. A. Civil Services

Shekta, Jalna Road, Tq. Dist. Aurangabad - 431 007.

Contact No. : 9764302627 / 9623916441 / 9923650160 / 7020134033 / 9823332733 / 9850056777

E-mail : mukeshpawar17783@gmail.com.



* संस्थापक/अध्यक्ष *
श्री. बाबुराव रामदास पवार

# - Director's Message -

Dearest Loving Student's,

Hi !!! Your Excellence !!

It givens immense pleasure in extending a hearty welcome to you all for selecting to fulfill your dreams with us.

We offer wide range of professional programme in the form of B.A. Civil Services
you will be under out truth full guidance and will make /raise as a perfect person for the world who are going to be known as skillful person in all fields. since your career begins and lasting with expert here at Shanta Baburao Pawar Sr. College , Sekta.

The Institute has a well qualified with rich in experienced and dedicated Faculty, The hightly Ethic , Transparent and Progressive Environment Developed by the talent faculty is conductive for the development of learing employment of knowledge and highly skill enhancement through inbuilt state of art. strongly believe that our student will be rising in a star and shining in their life. I am very happy and pride to say boldly that the outgoing smart and professional students are flying scattered & captures in the company , banks and the Multinational Trade and many more . Obviously but Definitely , one and all pass out students have the bright carriers and dreaming aims achievement . I assure you that your life in the campus as a student would be highly rewarding in terms of academic pursuit and filled with good human worth values. Last but Not Least , I highly appealed joyfully to our Dear & Near Students please let us together to achieve our aim targets and the completion of the dreams of ourselves with caring parents . I look forward to meeting you personally in our Campus for the super, super campion those are made us proud and pride . I thanked to have a long - term relationship with you .

## - FEATURE -

- Practical Attachment Training In Leading Organizations , Like Government Offices , Highly Qualified . Skilled And Experienced Staff Having Knowledge
- Assist The Students In Getting Jobs By Displaying The Jobs Vacancies In Respective Fields .
- Arrange Various Programs To Encourage Students.
- Fresh , Friendly , Energetic And Interlinking Environment Between The Staff And Students.

## - MISSION -

- We Serve To Save Our Country. Providing A Conductive Environment For Learning Skills Suitable To The Development Of Upcoming Generations.
- Striving To Inculcate A Deep Sense Of Commitment To Bring About All Round Development Of Young Generation. Providing Opportunities To Students Within & Outside The Class For The Development Of Over All Personality To Meet All Requirement Of The Challenging.
- Striving To Inculcate Moral & Ethical High Values Within The Students.
- Encouraging The Students To Serve For Our Nation & For Is Prosperity .

## - QUALITY -

We at Saibaba Shikshan Prasarka Mandal are committed too substation by providing , Professional and vocational skill education to student as per present and future needs and social for general public.

Towards this we have insulated quality management system and committed to continually improve its effectiveness by active involvement of all students

# * संस्थापकाचे मनोगत *

सध्याच्या स्पर्धेच्या युगात आपण सर्वजण संघर्ष करीत आहोत. यश संपादन करण्यासाठी धडपडत आहोत अशा स्पर्धेच्या युगात यश संपादन करावयाचे असतील तर नियोजनपूर्वक तयारी करणे गरजेचे आहे. कारण तुम्ही किती वर्ष जगलात यापेक्षा कसे जगलात याला जास्त महत्त्व असते.

ग्रामीण भागत राहणारा बहुजन , कष्टकरी, शेतकरी, कामगार, वाड्या तांड्यावर राहणारा समाज, दलित, आदिवासी, मुस्लीम व उपेक्षीत आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेल्या मराठा व इतर समाजातील वर्गांना उच्च शिक्षण मिळावे या उद्देशाने श्री साईबाबा शिक्षण प्रसारक मंडळ वसंतनगर जवाहर कॉलनी औरंगाबाद या संस्थेचे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून शेकटा ता.जि. औरंगाबाद येथे महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त व कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ संलग्नीत शांता बाबुराव पवार वरिष्ठ महाविद्यालय सुरू केलेले आहे. शेकटा या ठिकाणीच सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून जय तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सुरू आहे. संस्थेची शैक्षणिक क्षेत्रात चांगल्या पद्धतीने वाटचाल चालु असून त्या अनुषगांने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले पाहिजे या साठी संस्थेने बोकुड जळगांव ता. पैठण जि. औरंगाबाद येथे श्री साईबाबा मागास विद्यार्थी वस्तीगृह व रामदास नाईक हायस्कुल या नावाने शाळा व वस्तीगृह सन १९९४ पासुन सुरू केलेले आहे.

तसेच स्वराजनगर मुकूंदवाडी, औरंगाबाद या ठिकाणी श्री बालाजी विद्या मंदिर व श्री साईबाबा विद्यालय (प्राथमिक व माध्यमिक शाळा) सुरू केलेले आहे. आज घडीला दरवर्षी १० वी व १२ वीचे शिक्षण घेऊन जवळपास ३५० विद्यार्थी बाहेर पडत आहे. त्यांना पुढील शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी या उद्येशानेच शेकटा येथे वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. व तो सन २०२२-२०२३ पासून आमलात येत आहे.

आपल्या देशात ज्या समस्या आणि आव्हाने आहेत त्याचा सामना करून विद्यार्थी सक्षम कसे होतील व देशाच्या जडणघडणीत देशाच्या राष्ट्र उभारणीत आपला हातभार लावतील असे विद्यार्थी घडविण्याचा आमचा प्रयत्न राहील.

**श्री. बाबुराव रामदास पवार**
संस्थापक अध्यक्ष
श्री साईबाबा शिक्षण प्रसारक मंडळ
वसंतनगर, जवाहर कॉ. औरंगाबाद

## * महाविद्यालयाचे उद्देश *

१. ग्रामीण भगातील विद्यार्थ्यांना **उच्च शिक्षणाची** संधी उपलब्ध करून देणे.

२. सर्व समाजातील तरूणांना उच्च शिक्षण देवून त्यांना **स्वयंपूर्ण व शिस्तप्रिय** बनविणे

३. बदलत्या काळानुसार आणि गरजेनुसार तालुक्यातील विद्यार्थी – विद्यार्थीनींना **व्यवसायभिमुख आणि माहिती तंत्रज्ञान विषयक** शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे.

४. अभ्यासेत्तर व अभ्यासपुरक उपक्रमाद्वारे **विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास** करणे.

५. लोकशाही आणि मानव मुल्यांची रूजवात व्हावी म्हणून विविध स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करणे.

६. राष्ट्रीय सेवा योजना **(NSS)** द्वारे विद्यार्थ्यांमध्ये **समाजसेवा, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक ऐक्य** आणि ग्रामीण जनतेच्या विकासाठी समाजप्रबोधन करण्याची प्रवृत्ती निर्माण करणे.

७. **शैक्षणिक कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती** इ. क्षेत्रात महाविद्यालयाची एक स्वतंत्र ओळख तयार करणे.

८. **राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडू** तयार करणे.

९. विद्यार्थ्यांना **स्पर्धात्मक परीक्षेत यशस्वी होण्यासाठी** व व्यवसायासाठी मार्गदर्शन करणे.

१०. महाविद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमात पालक, शहर व परिसरातील इतर संस्थाचा सहभाग वाढावा व विचाराचे आदान प्रदान होण्याठी **माजी विद्यार्थी मेळावे, पालक मेळावे, विविध चर्चासत्रे, व्याख्यान माला** आयोजित करणे.

# * प्राचार्य मनोगत *

प्रिय विद्यार्थी मित्र हो.. !

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन...!

**B.A.** पदवी शिक्षण घेण्यासाठी शांता बाबुराव पवार महाविद्यालय (सिव्हील सर्व्हिसेस) ची निवड केल्याबद्दल आपले धन्यवाद..!

श्री. साईबाबा शिक्षण प्रसारक मंडळ , वसंतनगर, जवाहर कॉलनी , औरंगाबाद संचलित शांता बाबुराव पवार महाविद्यालय (सिव्हील सर्व्हिसेस) शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून स्थापना करण्यात आली आहे. शेतकरी, दुर्लक्षित घटक, आर्थिक मागसलेपण असलेल्या समाजातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सार्वांगिण प्रगतीच्या मुख्य प्रहावात आणण्याच्या उदात्त हेतूने आमचे महाविद्यालय सतत कटीबद्ध असून त्यासाठी सदैव प्रयत्नशिल आहे.

विद्यार्थी हा ज्ञानवंत, शिलवंत तर बनलाच पाहिजे, परंतु त्याचा सर्वांगिण विकास हे आमचे ध्येय असल्याने महाविद्यालयात ग्रंथालय, राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) व भव्य क्रिंडागण असल्याने विद्यार्थी राज्य, राष्ट्रीय स्तरावर कबड्डी, नेमबाजी व कुस्ती या खेळ स्पर्धेमध्ये विद्यार्थी नावा रूपाला येणार आहे यात शंका नाही.

प्राचार्य

**श्री. मुकेश पवार**

शांता बाबुराव पवार वरिष्ठ महाविद्यालय
(सिव्हील सर्विसेस)
शेकटा ता.जि. औरंगाबाद

Saibaba Shikshan Prasarak Mandal
SHANTA BABURAO PAWAR SENIOR COLLEGE

## * महाविद्यालयातील कार्यान्वित विभाग

१. सांस्कृतिक विभाग
२. क्रिडा विभाग
३. राष्ट्रीय सेवा योजना
४. सुसज्ज ग्रंथालय व वाचनकक्ष
५. शैक्षणिक सहल विभाग
६. महिला तक्रार निवारणक समिती
७. विशाखा समिती
८. अॅन्टी रॅगिंग समिती
९. विद्यार्थी कल्याण विभाग

## * महाविद्यालयातील विविध अभ्यास मंडळ

१. भाषा व वाङ्:मय मंडळ
२. सामाजिक शास्त्र मंडळ
३. क्रिडा मंडळ

| | |
|---|---|
| विद्यार्थ्यासाठी विविध उपक्रम | कार्यक्रम संचालन |
| विद्यार्थी संसद | व्याख्यान पद्धती |
| युवक महोत्सव | वर्गपाठ व गट चर्चा |
| सहकार व उद्योजकता शिबीरे | सेमिनार व कार्यशाळा |
| स्नेह-संमेलन | औद्योगिक सहल |
| शैक्षणिक सहल | निमंत्रीत वक्त्यांची व्याख्याने |
| रक्तदान शिबीर | शैक्षणिक सहल |
| व्यक्तिमत्व विकास शिबीर | प्रकल्प पुर्ती |
| आरोग्य तपासणी | घटक चाचणी |

## ＊ महाविद्यालयातील प्रवेशासाठी पात्रता

विद्यार्थी १२ वी किंवा समकक्ष इतर परिक्षा उत्तीर्ण असावा.

किंवा

विद्यार्थी १२ वी (एम.सी.व्ही.सी.) उत्तीर्ण असावा.

किंवा

विद्यार्थी तीन वर्षाचा डिप्लोमा इतर इंजिनिअरींग हा महराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.

किंवा

विद्यार्थी हा डिप्लोमा इन फार्मसी (डी.फार्म) ची परीक्षा उत्तीर्ण असावा.

प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

१. शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (टि.सी. मुळप्रत)
२. एस.एस.सी.(१०वी) गुणपत्रक झेरॉक्स
३. एस.एस.सी.(१०वी) टी.सी. झेरॉक्स
४. एच.एस.सी. (१२वी) गुणपत्रक (मार्कमेमो) झेरॉक्स
५. एच.एस.सी. (१२वी) टि.सी. झेरॉक्स
६. पासपोर्ट साईज फोटो (२)
७. जातीचे प्रमाण पत्र (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी)
८. उत्पन्नाचा दाखला (तहसिल दाराच्या सहिणे, शिष्यवृत्ती धारकासाठी)
९. रहिवासी दाखला (तहसिल दाराच्या सहिणे, शिष्यवृत्ती धारकांसाठी)
१०. पात्रता प्रमाणपत्र (द्वितीय व तृतीय वर्षा करिता)
११. एमएस-सीआईटी / इतर संगणक कोर्स पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र
१२. आधार कार्डाची झेरॉक्स

**प्रवेश नुतनीकरण**

मागील वर्षी बी.ए. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षात प्रवेश मिळण्यासाठी प्रवेशाच्या नुतनीकरणाचा अर्ज दाखल करून आपल्या प्रवेशाचे नुतनीकरण करून घ्यावे लागेल. आपल्या प्रवेशाचे नव्या शैक्षणिक वर्षात नुतनीकरण करून घेणारा विद्यार्थीच पुढील वर्षासाठी अधिकृत विद्यार्थी म्हणून गृहित धरला जाईल

# * महाविद्यालयातील प्रवेशासाठी पात्रता

**B.A - Civil Services** (प्रशासकीय सेवा)

1. **Compulsory Subjects**

1. इंग्रजी, संस्कृत, सामान्य अभ्यास संस्कृत साहित्य

१. इतिहास २. समाजशास्त्र ३. राज्यशास्त्र ४. सार्वजनिक प्रशासन, अर्थशास्त्र ५. गणित

## * विद्यार्थी संसद–

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार विद्यार्थी संसदेची रचना केली जाते. प्रत्येक वर्गातुन एक वर्ग प्रतिनधी गुणवत्तेनुसार नियुक्त केला जातो. त्या शिवाय अ) सांस्कृतिक ब. क्रिडा क) राष्ट्रीय सेवा योजना या क्षेत्रातुन विद्यार्थ्यांची मागील वर्षांची गुणवत्ता विचारात घेऊन नियुक्ती केली जाते. विद्यार्थ्यांनिमधुन दोन प्रतिनिधींची निवड करतात. एका प्राध्यापकाची नेमणुक कार्यकारी अध्यक्ष म्हणून केली जाते. प्राचार्य संसदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.

## * क्रीडा :–

महाविद्यालयाच्या शारिरीक शिक्षण विभागातील व्हॉलीबॉल, क्रिकेट, टेनिस, कबड्डी, खो–खो, फुटबॉल बास्केट बॉल, शटल आणि ॲथलेटिक्स या खेळाच्या सोई सुविधा उपलब्ध आहेत.

## * ग्रंथालय विभगा :–

विद्यार्थ्यांने महाविद्यालयाचे ओळखपत्र स्वत :जवळ बाळगणे अनिवार्य आहे.

ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यास ग्रंथालयातील सुविधेचा लाभ घेता येणार नाही.

विद्यार्थ्याने ग्रंथालयातून घेतलेली पुस्तके ७ दिवसाच्या आत जमा करणे अनिवार्य आहे.

ग्रंथालयातील पुस्तके ७ दिवसांच्या आत जमा न केज्ल्यास प्रतिपुस्तक १ रू प्रतिदिवस दंड आकारण्यात येईल.

महाविद्यालयाने प्रत्येक शाखेस ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार पुस्तकांचे वितरण करण्यात येईल.

विद्यार्थ्यांकडून ग्रंथालातील शाखेस पुस्तके हरवल्यास किंवा खराब झाल्यास पुस्तकांचे संपूर्ण शुल्क आकारण्यात येईल.

विद्यार्थ्यांकडून ओळखपत्र हरवल्यास द्वितीय प्रत घेण्यासाठी ५० रू. शुल्क आकारले जाईल. विद्यार्थ्यांने ग्रंथालयातून घेतलेली पुस्तके परिक्षेआधी ग्रंथालयात जाम करणे अनिवार्य आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यास परीक्षेचे ओळखपत्र ग्रंथालयाचे नादेय प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

### * शिस्त

१. स्वयंशिस्त ही सर्वोत्तम शिस्त होय. महाविद्यालयीन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन नियम व अटीचे पालन करणे आवश्यक आहे.

२. महाविद्यालयात किंवा परिसारात प्रशासनाच्या परवानगी शिवाय कोणतेही कृती / कार्यक्रम करण्यास मज्जाव राहील. कोणताही राजकीय किंवा अन्य स्वरूपाचा बाह्य दबाव महाविद्यालयावर आणल्यास शिस्तीचे उल्लंघन समजले जाईल.

३. प्राचार्यांच्या पुर्व परवानगीशिवाय महाविद्यालयामध्ये कोणतीही संघटना स्थापन करण्यास वा कोणत्याही संघटनेची शाखा स्थापन करण्यास मज्जाव राहील.

४. महाविद्यालयाच्या परिसरात भ्रमनध्वनी वापरण्यास मनाई आहे.

५. महाविद्यालयाच्या परिसरात तंबाखु वा तंबाखुजन्य तसेच मादक पदार्थ खाण्यास व सेवन करण्या मनाई आहे.

### * महाविद्यालयीन विद्यार्थ्यांने खालील सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे

१. वर्गामध्ये आणि सभागृहामध्ये दिलेल्या सुचना काळजीपुर्वक ऐकाव्यात आणि त्या सुचनांचे पालन करावे.

२. शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी यांच्याशी आदरभावाने वागणे प्रत्येक विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे.

३. सुचना फलकावरील सुचना नियमित वाचाव्यात.

४. महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता राखावी.

५. महाविद्यालयीन व्हरांड्यात रेंगाळगण्यास परवानगी नाही.

६. विद्यार्थ्यांनी तास नसलेल्या काळात ग्रंथालयाचा वापर करावा.

७. ग्रंथालयात मोठ्याने बोलु नये, चर्चा करू नये, शांतता राखावी

८. विद्यार्थ्यांनी नियम बाह्य गट- तट बांधणीस परवानगी नाही.

९. महाविद्यालय परिसरातील भिंती, वर्गातील फलक, सुचना फलकावर अवाच्च लिखान करणे व हस्तपत्रके किंवा जाहिराती चिकटवण्यास सक्त मनाई आहे.

## * रॅगिंगबाबत महत्वाच्या सुचना *

महाविद्यालयात नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांचा परिचय किंवा ओळख या नावाखाली विद्यार्थ्यांचे शारीरिक भावनिक, मानसिक हनन प्रत्यक्ष किंवा शाब्दीक कृतीतून करणे, असे वर्तन रँगिग असून शिक्षेस पात्र ठरते.

आधुनिक युगात रॅगिंग हा शब्द चिडविणे, भीती दाखवणे, छळ करणे, क्रुरता, शारीरीक व मानसिक हनन प्रत्यक्ष किंवा शाब्दीक कृतीतून करणे असे वर्तन रँगिग असून शिक्षेस पात्र ठरते.

रँगिग हा महाविद्यालये, विद्यापीठ तसेच शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरीक व लैगिंग छळाचा वर्षानुवर्षे चालु असलेला प्रकार आहे. रँगिगद्वारे विद्यार्थ्याचे मानसिक व भावनिक विश्व उद्धवस्त होऊन त्याचा जगण्यावरील विश्वास नाहीसा होतो. यामुळे विद्यार्थ्यी आत्महत्येस प्रवृत्त होऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न व प्रत्यक्ष आत्महत्या सुद्धा करतात.

रँगिगमध्ये रँगिग करणारा हा स्वत: गुन्हा करतो. ज्यावर रँगिग केली जाते त्यासही गुन्ह्यास प्रवृत्त केले जाते. हा दखलपात्र गुन्हा आहे. रँगिग करताना विद्यार्थ्यांना लाज वाटेल, भिती निर्माण होईल, संकोच वाटेल असेच वर्तन करविले जाते. तसेच चिडविणे, छेडछाड करणे तसेच विर्द्यार्थ्यांना अपमानित करणे , शिष्टाचाराचे उल्लंघन करणे, धमकी देणे, हिनतेची वागणुक देणे त्यांना हिंसाचारास उद्युक्त करणे व हानी पोहचविणे या बाबींचा रँगिगमधे समावेश होतो.

या सर्व बाबी व्यक्तीच्या व्यक्ती म्हणून जगण्याचा मूलभूत अधिकारांवर गदा आणल्यासारखा आहेत. यासाठी सर्वोच्च न्यायालयाने कठोर दंडाची शिफारस केलेली आहे.

रँगिंग केल्यामुळे रँगिग करणाऱ्यास महाविद्यालय व वस्तीगृहातून काढून टाकण्यात येऊ शकते. तसेच इतर कुठल्या ही महाविद्यालयात संबंधित विद्यार्थ्यांस प्रवेश दिल्या जात नाही. त्या विद्यार्थ्यास मिळणाऱ्या सर्व सोयी सुविधा बंद केल्या जावू शकतात. गरज पडल्यास रँगिगचे स्वरूप लक्षात घेऊन फौजदारी कार्यवाही केली जावू शकते. यासाठी विद्यार्थी व शैक्षणिक संस्थानी आपल्या सर्वांगिण विकासासाठी तसेच सुंदर व सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी रँगिगसारख्या कलंकित प्रकारास त्वरीत आळा घालण्यासाठी प्रयत्न करावयाचा हवे. वरील सर्व बाबींची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घेऊन वरील सर्व गोष्टीपासून दूर राहून आपल्या स्वत: चा सर्वांगिण विकास करून देशाचे सुजान नागरिक बनवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी असे महाविद्यालयाच्या वतीने सर्वांना आवाहन करण्यात येते.

### * प्रवेश रद्द करण्यासंबंधीचे नियम :

१. विदयार्थ्यांनी ३१ जुलैपुर्वी प्रवेश रद्द केल्यास एकूण फिसच्या २० टक्के रक्कम कपात करून उर्वरित फिस परत करण्यात येईल. २. विद्यार्थ्यांनी ३१ जुलैच्या नंतर व प्रथम सत्रापुर्वी प्रवेश रद्द केल्यास एकूण फिसच्या ५० टक्के रक्कम कपात केली जाईल. ३. विद्यार्थ्यांनी प्रथम सत्रानंतर प्रवेश रद्द केल्यास संपुर्ण फिस भरल्यानंतर प्रवेश रद्द करण्यात येईल.

Saibaba Shikshan Prasarak Mandal
SHANTA BABURAO PAWAR SENIOR COLLEGE

## * महाविद्यालयातील प्रवेशासंबंधी सुचना *

१. विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिल्या जातो.

२. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या धोरणानुसार आरक्षण आहे.

३. महाविद्यालयात भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत कले जाणार नाही.

४. कार्यालयात दिलेली कागदपत्रे संबंधीत काम पुर्ण झाल्याशिवाय परत दिली जात नाहीत म्हणून विद्यार्थ्यांना मुळ कागदपत्रांच्या जास्तीत जास्त झेरॉक्स प्रति जवळ ठेवाव्यात.

५. मुळ कागदपत्रे कार्यालयात सादर केल्यावर त्या बद्दल पोहच (पावती) घ्यावी.

६. स्थलांतर प्रमाणपत्र, निकालपत्र व इतर कागदपत्रे ठरलेल्या वेळेच्या आत सादर करावे. वेळेवर कागदपत्रे सादर न केल्यास प्रवेश रद्द केल्या जाईल.

७. विद्यार्थ्यांना ॲप्रान आवश्यक राहील.

८. विद्यार्थ्यांने पात्रता परिक्षा उत्तीर्ण झाल्यापासून १० दिवसाच्या आत प्रवेश घ्यावा.

९. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांने स्वत: उपस्थित असणे आवश्यक आहे.

१०. विद्यार्थ्यांने प्रवेश अर्ज माहिती पुस्तिकेतील सर्व नियम व सुचना वाचून काळजीपूर्वक भरावा.

११. जे विद्यार्थी महाविद्यालयातील नियम व शिस्तीचे पालन करणार नाही अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

१२. विद्यार्थ्यास प्रवेश शुल्क प्रवेशावेळी जमा करावे लागेल.

१३. विद्यार्थ्यांने प्रवेशावेळी निवडलेले विषय अंतीम राहतील. त्यात बदल करता येणार नाही.

१४. महाविद्यालयात घेतलेला प्रवेश विद्यापीठ मान्यतेशिवाय पुर्ण होणार नाही.

१५. प्रत्येक विद्यार्थ्यांस महाविद्यालयात किमान ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. त्या शिवाय परीक्षा फार्म भरता येणार नाही.

## * प्रवेशासंबंधी अटी व नियम *

१. प्रत्येक वर्षी प्रवेश घेणे आवश्यक आहे. एकदा घेतलेला प्रवेश एक वर्षाकरिता नोंदविला जातो.

२. प्रत्येक वर्ग / तुकडी अथवा विषयासाठी शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी संस्थेची अट पूर्ण झाल्यानंतर संबंधीत वर्ग/ तुकडी अथवा विषयाचा अभ्यासक्रम शिकविला जाईल. शासनाच्या नियमापेक्षा एखाद्या वर्ग/ तुकडी अथवा विषयाला जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार नाही.

३. महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना सोबत जोडलेल्या प्रवेश अर्जात आवश्यक ती माहिती भरून दिलेल्या मुदतीत आवश्यक ते शुल्क व कागदपत्रांसह कार्यालयात दाखल करावा.

४. प्रथमत सर्व प्रवेश हंगामी स्वरूपाचे असतील प्रवेशासंबंधी काही उणीव आढळून आल्यास प्रवेश रद्द करण्याचा अधिकार महाविद्यालयास राहील व त्यासाठी कारणे दाखविणयासाची आवश्यकता नाही.

५. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतिय वर्षाला प्रत्येकी दोन सेमिस्टर राहतील. त्यावेळी प्रत्येक सेमिस्टरची परीक्षा फीस प्रत्येक वेळेस विद्यार्थ्याला भरणे आवश्यक राहिल. त्याशिवाय परीक्षेला बसता येणार नाही.

६. विद्यार्थ्यांनी कार्यालयात येण्यापूर्वी प्रथम सुचना फलकावरील सुचना वाचाव्यात कोणती सूचना वर्गात पाठविली जाणार नाही. सूचना केवळ नोटीस बोर्डावरच लावल्या जातील. ग्रंथालयातसंबंधी सुचना ग्रंथालयातील नोटीस बोर्डावर लागल्या जातील.

७. प्रवेशाच्या तारखा, परिक्षा फीसच्या तारखा, शिष्यवृत्ती तारखा इ. या वेळोवेळी सूचना फलकावर लावल्या जातील. कोणालाही माहिती कळविली जाणार नाही. तारीख निघून गेल्यानंतर वरील फार्म भरता आले नाहीत अथवा अन्य काही नुकसान झाले तर केवळ विद्यार्थी स्वत : त्यास जबाबदार राहतील.

# * शिष्यवृत्ती धारकाबाबत *

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर एक महिन्याच्या आत शिष्यवृत्ती अर्ज अचुक माहितीसह Online भरून स्वत:च्या हस्ते कार्यालयात आवश्यक त्या खालील कागदपत्रांसह सादर करावा.

शिष्यवृत्तीसाठी लागणारे कागदपत्रे

१. १२ वी टी.सी. (एक झेरॉक्स)

२. १२ वी मार्कशीट (एक झेरॉक्स)

३. १० वी मार्कशीट (एक झेरॉक्स)

४. १० टी.सी. (एक झेरॉक्स)

५. आधार कार्ड (एक झेरॉक्स)

६. Cast असल्यास Cast (एक झेरॉक्स)

७. उत्पन्न प्रमाणपत्र तहसिलदारच्या स्वाक्षरीने (Income Certificate Original)

८. रहिवासी प्रमाणपत्र तहसिलदाराच्या स्वाक्षरीने (Domecil Certificate Original)

९. बँक पास बुक (एक झेरॉक्स)

१०. शिक्षणात खंड असल्यास खंड प्रमाणपत्र (Gap Certificate)

११. Bank Account No. ला आधार कार्ड व Mobile No. Link असने आवश्यक आहे.

१२. आधार कार्ड ला Mobile No. Link असने आवश्यक आहे.

## * संस्था कार्यकारिणी मंडळ *

### श्री. बाबुराव रामदास पवार – संस्थापक अध्यक्ष

१. श्री. भरत शामा राठोड – अध्यक्ष

२. श्री. राकेश बाबुराव पवार – उपाध्यक्ष

३. श्री. राजेंद्र गुलाबसिंग जाधव– सचिव

४. श्री. नितेश बाबुराव पवार – सहसचिव

५. सौ. शांताबाई बाबुराव पवार – सदस्य

६. सौ. अनुसयाबाई कवरसिंग पवार – सदस्य

७. श्री. बाबुराव रामदास पवार – सदस्य

## * शालेय समिती *

१. श्री. लक्ष्मण प्रल्हादराव वाघ – अध्यक्ष

२. श्री. सुरेश देवराव नवपूते – उपाध्यक्ष

३. श्री. डी.टी. मोरे – सचिव

४. श्री. शंकर धनसिंग पवार – सदस्य

५. श्री. टी.के. राठोड – सदस्य

६. श्रीमती एस. व्ही. सराफ – सदस्या

७. श्रीमती एस. बी. उबाळे – सदस्या

# B. A.
# Civil Services

**Name of the Course** : B.A. Civil Services
**Examination** : Semester
**Course Duration** : 03 Year (6 Semester)
**Eligibility** : The candidates must have passed XII State Board Examination or equivalent.
**Age limit** : Upto 25 Years

IAS UPSC MPSC IFS

**B.A.**
**Civil Services**

NDA CAPF CISF ESE

IES CDS CMSE CGSE

## * भविष्यातील संधी *

१. भारतीय प्रशासकीय सेवा (IAS) २. भारतीय परराष्ट्र सेवा (IFS)
३. भारतीय पोलीस सेवा (IPS) ४. भारतीय राजस्व सेवा (IRS)
५.भारतीय व्यापार सेवा (ITS) ६. भारतीय सरंक्षण दल सेवा (IDAS)
७. भारतीय सुचना सेवा (IIS) ८. भारतीय रेल्वे नोकर भरती (IRPS)
९.सीमा संरक्षण दल १०.कार्यदर्शिका केंद्रीय गुप्तवार्ता (CBI)
११.मुख्य सचिव १२. प्रधान सचिव १३.जिल्हाधिकारी १४.मुत्सादी
१५.परराष्ट्र सचिव १६.उच्च आयुक्त १७. होमगार्डस विभाग
१८.कर आयुक्त १९. मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO)
२०.पोलीस उपनिरिक्षक २१. विक्री कर निरिक्षक

**Documents Required** : 12 th T.C. ( Original ) | 12 th Mark (Original ) 10th Mark (Original ) | Caste Certificate (Photo Copy) | Adhar Card (Photo copy) | Photo - 4 | Imcome Certificate (Original) | Ration Card (Photo copy) | Bank Passbook (Photo copy)

**All the Above documents required with T.C.* 6 Photo Copies of Documents required to submit at the time of admission.**

Saibaba Shikshan Prasarak Mandal

SHANTA BABURAO PAWAR SENIOR COLLEGE

## श्री साईबाबा शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद संचालित

१) शांता बाबुराव पवार सीनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, शेकटा ता. जी. औरंगाबाद.

२) जय तुळजाभवानी विद्यालय शेकटा ता. जि. औरंगाबाद.

३) जय तुळजाभवानी उच्च माध्यमिक विद्यालय, शेकटा, ता. जि. औरंगाबाद.

४) रामदास नाईक हायस्कुल बोकुड जळगांव ता. पैठण जि. औरंगाबाद.

५) बालाजी विद्या मंदिर स्वराज नगर, मुकुंदवाडी, औरंगाबाद.

६) श्री साईबाबा मागास विद्यार्थी वसतिगृह, बोकुड जळगांव, ता. पैठण, जि. औरंगाबाद.

७) श्री साईबाबा विद्यालय स्वराज नगर मुकुंदवाडी औरंगाबाद.

Saibaba Shikshan Prasarak Mandal

# SHANTA BABURAO PAWAR SENIOR COLLEGE

Shekta, Jalna Road, Tq. Dist. Aurangabad - 431 007.

E-mail : mukeshpawar17783@gmail.com.

Contact No. : 9764302627 / 9623916441 / 9923650160 / 7020134033 / 9823332733 / 9850056777